नवगण शिक्षण संस्था राजूरी संचालित

# वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा जि. बीड

## मराठी विभाग

## त्रैभाषिक राष्ट्रीय ई-चर्चासत्राचा अहवाल

---

दि. २७ फेब्रुवारी २०२१ रोजी मराठी विभागाच्या वतीने त्रैभाषिक राष्ट्रीय ई चर्चासत्र घेण्यात आले. हे चर्चासत्र घेण्यासाठी मराठी विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी अंतर सहयोग करण्यात आला. Covid-19 महामारीचा काळ असल्यामुळे महाविद्यालयाच्या वतीने लेखन व संशोधन कार्याला गती देण्यासाठी इ चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्राचा मुख्य विषय लोकसाहित्याचे अंतरंग आणि वैश्विक स्वरूप हा होता. हे चर्चासत्र प्रामुख्याने मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषेमध्ये आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उप विषय पुढील प्रमाणे होते.

**घटक विषय :-**

**मराठी भाषेकरिता:**

01) लोकसाहित्य आणि पौराणिक कथा.

02) आदिवासी लोकसाहित्याचे अंतरंग.

03) लोकसाहित्य आणि नैसर्गिक पर्यावरण.

04) लोकसाहित्यातील लिंगभाव .

05) लोकसाहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन .

**इंग्रजी भाषेकरिता:**

01) Folklore and Mythology.

02) Tribal Folklore.

REDMI NOTE 5 PRO

03) Folklore and Natural Environment.

04) Gender Roles In Folklore.

05) Social and Cultural Life In Folklore.

**हिंदी भाषेकरिता:**

01) लोकसाहित्य और पौराणिक कथाऐं

02) लोकगीत और लोककथाओं का स्वरूप

03) लोकसाहित्य की रचना स्थली

04) लोकसाहित्य का जीवन

05) लोक साहित्य की प्रवृत्तीयाँ

या चर्चासत्राचा उद्धाटन समारंभ दि.27/02/2021 रोजी सकाळी 11:00 वाजता पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम राख हे होते तर उदघाटक म्हणून प्रोफेसर डॉ. दासू वैद्य (प्रमुख, मराठी विभाग तथा अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद ) यांची ऑनलाईन प्रमुख उपस्थिती होती.

बीज भाषक म्हणून प्रोफेसर डॉ. भाऊसाहेब राठोड, प्रमुख, मराठी विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि. बीड. यांनी आपले विचार व्यक्त केले तर सत्राध्यक्ष म्हणून डॉ. छबिलदास करंके, प्रमुख, मराठी विभाग, ग्रामविकास संस्थेचे कला महाविद्यालय बामखेडे ता.शहादा जि. नंदूरबार यांनी जबाबदारी पार पडली.

या चर्चासत्रामध्ये एकूण १५० प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच एकूण १७ प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी आपले निबंधाचे सादरीकरण केले. हे चर्चासत्र यासगस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. रामनाथ वाढे प्रा. डॉ. हमराज उईके, प्रा. कुलदीप सानप यांनी परिश्रम घेतले. करिता वरील प्रमाणे चर्चासत्राचा अहवाल सादर करण्यात येतो.

मराठी ...
पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय
पाटोदा, जि.बीड.

**Principal**
Vasantdada Patil College
Patoda, Tq.Patoda Dist.Beed.

नवगण शिक्षण संस्था राजूरी संचालित

**वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा जि. बीड**

**मराठी विभाग**

**त्रैभाषिक राष्ट्रीय ई-चर्चासत्राचा अहवाल**

---

दि. २७ फेब्रुवारी २०२१ रोजी मराठी विभागाच्या वतीने त्रैभाषिक राष्ट्रीय ई चर्चासत्र घेण्यात आले. हे चर्चासत्र घेण्यासाठी मराठी विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी अंतर सहयोग करण्यात आला. Covid-19 महामारीचा काळ असल्यामुळे महाविद्यालयाच्या वतीने लेखन व संशोधन कार्याला गती देण्यासाठी इ चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्राचा मुख्य विषय लोकसाहित्याचे अंतरंग आणि वैश्विक स्वरूप हा होता. हे चर्चासत्र प्रामुख्याने मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषेमध्ये आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उप विषय पुढील प्रमाणे होते.

**घटक विषय :-**

**मराठी भाषेकरिता:**

01) लोकसाहित्य आणि पौराणिक कथा.

02) आदिवासी लोकसाहित्याचे अंतरंग.

03) लोकसाहित्य आणि नैसर्गिक पर्यावरण.

04) लोकसाहित्यातील लिंगभाव .

05) लोकसाहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन .

**इंग्रजी भाषेकरिता:**

01) Folklore and Mythology.

02) Tribal Folklore.

03) Folklore and Natural Environment.

04) Gender Roles In Folklore.

05) Social and Cultural Life In Folklore.

**हिंदी भाषेकरिता:**

01) लोकसाहित्य और पौराणिक कथाऐं

02) लोकगीत और लोककथाओं का स्वरूप

03) लोकसाहित्य की रचना स्थली

04) लोकसाहित्य का जीवन

05) लोक साहित्य की प्रवृत्तीयाँ

या चर्चासत्राचा उद्धाटन समारंभ दि.27/02/2021 रोजी सकाळी 11:00 वाजता पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम राख हे होते तर उदघाटक म्हणून प्रोफेसर डॉ. दासू वैद्य् (प्रमुख, मराठी विभाग तथा अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद ) यांची ऑनलाईन प्रमुख उपस्थिती होती.

बीज भाषक म्हणून प्रोफेसर डॉ. भाऊसाहेब राठोड, प्रमुख, मराठी विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि. बीड. यांनी आपले विचार व्यक्त केले तर सत्राध्यक्ष म्हणून डॉ. छबिलदास करंके, प्रमुख, मराठी विभाग, ग्रामविकास संस्थेचे कला महाविद्यालय बामखेडे ता.शहादा जि. नंदूरबार यांनी जबाबदारी पार पडली.

या चर्चासत्रामध्ये एकूण १५० प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच एकूण १७ प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी आपले निबंधाचे सादरीकरण केले. हे चर्चासत्र यासगस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. रामनाथ वाढे प्रा. डॉ. हमराज उईके, प्रा. कुलदीप सानप यांनी परिश्रम घेतले. करिता वरील प्रमाणे चर्चासत्राचा अहवाल सादर करण्यात येतो.

## चर्चासत्राचे प्रमाणपत्र



मराठी विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि
मराठी विभाग
वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा, जि. बीड
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

त्रैभाषिक राष्ट्रीय ई-चर्चासत्र

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, प्रा.डॉ.______________________________

यांनी ______________________________ दि. २७ फेब्रुवारी २०२१ रोजी घेण्यात आलेल्या ''लोकसाहित्याचे अंतरंग आणि वैश्विक स्वरूप'' या विषयावरील राष्ट्रीय ई-चर्चासत्रामध्ये सहभाग / शोधनिबंध वाचन / प्रकाशित केल्याबद्दल त्यांना हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| डॉ. हंसराज ऊईके | प्रोफेसर रामनाथ वाढे | डॉ. बळीराम राख |
| समन्वयक | संयोजक | प्राचार्य |

SHREE graphics

दिव्य मराठी
बीड सिटी
बीड, रविवार, २८ फेब्रुवारी २०२१

**दिव्य मराठी विशेष** • वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात चर्चासत्र उत्साहात

# मानवी जीवनाच्या जडणघडणीत लोकसाहित्याचे महत्त्व

प्रतिनिधी | पाटोदा

आपल्या बालपणापासूनच भोवतालच्या विविध विषयांच्या लोकसाहित्यातूनच आपण पुढे येत असतो, म्हणून मानवी जीवनाची जडणघडण करण्यात लोकसाहित्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे मत डॉ. कोतापल्ले यांनी व्यक्त केले.

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २७ फेब्रुवारी रोजी 'लोकसाहित्याचे अंतरंग आणि त्याचे वैश्विक स्वरूप' या विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील त्रैभाषिक ई-चर्चासत्र उत्साहात झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा मराठी विभाग आणि वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बळीराम राख होते. तर उद्घाटक म्हणून डॉ. दासू वैद्य उपस्थित होते.

डॉ. दासू वैद्य म्हणाले की, लोककथांचा कोणी लेखक नसतो. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. लोककथा या जीवनाचा एक भाग बनलेल्या असतात. सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. लोकसाहित्याच्या अभ्यासाचा इतिहास स्पष्ट करताना ते म्हणाले की, लोकसाहित्याच्या संकलनाचा १७ व्या शतकात युरोपमध्ये प्रारंभ झाला. इंग्रजांच्या सत्ता कालखंडात भारतीय लोकसाहित्याच्या अध्ययनाची सुरुवात झाली. वि. का. राजवाडे यांनी महाराष्ट्रात लोकसाहित्याच्या अभ्यास व संशोधनाची मुहूर्तमेढ रोवली. खरे तर कित्येक भटक्या जमाती आदिम, जातीच्या लोक साहित्याचे संकलन व अध्ययन अजूनही झालेले नाही. त्याचे संकलन व संशोधन होणे गरजेचे आहे. लोकसाहित्याचा अभ्यास हा अशा जात-जमातींच्या विविध सण व उत्सवांमध्ये सहभागी होऊन प्रत्यक्ष व परिस्थितीजन्य पुरावे प्राप्त करून केला पाहिजे. तेव्हाच वास्तविक संशोधन साध्य होईल, असे ते म्हणाले.

लोकसंस्कृती अथवा आदिम संस्कृती व ग्रामीण संस्कृती यामध्ये बरेच साम्य असल्याचे दिसून येते. एका कोणत्या तरी मूळ संस्कृतीमधून त्या विकसित झाल्या असाव्यात, असेही मत त्यांनी मांडले. औद्योगिकीकरण, जागतिकीकरणाच्या रेट्याने आपली ग्रामीण व लोकसंस्कृती उद्ध्वस्त होते की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. लोकसाहित्य, लोकसंस्कृती लोप पावण्याआधी तिचे जतन केले जाणे गरजेचे आहे. पहिल्या सत्राचे आभारप्रदर्शन मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. रामनाथ वाढे यांनी केले. निबंध सादरीकरणाच्या दुसऱ्या सत्रात प्रा. कुशाबा साळुंके, प्रा. डॉ. रेखा मुळे आदींनी संशोधनपर लेखांचे सादरीकरण केले. सत्रांचे अध्यक्षस्थान डॉ. छबिलदास करंके यांनी भूषवले. सूत्रसंचालन डॉ. हमराज उईके यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. डॉ. रामनाथ वाढे यांनी केले. यात ८४ जणांनी सहभाग घेतला.

**लोकसंस्कृतीचे जतन करा**

औद्योगिकीकरण, जागतिकीकरणाच्या रेट्याने आपली ग्रामीण व लोकसंस्कृती उद्ध्वस्त होते की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. लोकसाहित्य, लोकसंस्कृती लोप पावण्याआधी तिचे जतन केले जाणे गरजेचे आहे.

---

झुंजार नेता
सोमवार दि. १ मार्च २०२१ R.N.I.NO.16856 /68\ Postal No - L/117/RN

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात लोक साहित्याचे अंतरंग विषयावर ई-चर्चासत्र संपन्न

पाटोदा दि. २८ ( प्रतिनिधी ) येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २७ फेब्रुवारी रोजी 'लोकसाहित्याचे अंतरंग आणि त्याचे वैश्विक स्वरूप' या विषयावरील राष्टीय स्तरावरील त्रैभाषिक ई-चर्चासत्र उत्साहात संपन्न झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा मराठी विभाग आणि वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बळीराम राख होते. चर्चासत्रांचे उद्घाटक विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख व मराठी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष डॉ. दासू वैद्य होते. आपल्या उद्घाटनपर भाषणात डॉ. दासू वैद्य म्हणाले की लोककथांचा कोणी लेखक नसतो. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. लोककथा ह्या जीवनाचा एक भाग बनलेल्या असतात. लोकसाहित्याच्या आकलनाच्या नव्या दिशा धुंडाळतांना ते नवनवीन दृष्टिकोनातून अभ्यासून नवनवे अर्थ शोधून काढणे गरजेचे आहे. राजसत्ता व धर्मसत्ता यांच्या परिघाबाहेर राहणाऱ्या वर्गाकडून निर्माण होणारे साहित्य हे लोकसाहित्य असते या डॉ. नागनाथ कोतापल्ले यांच्या व्याख्येचा संदर्भ त्यांनी याप्रसंगी दिला.

आपल्या बालपणापासूनच भोवतालच्या विविध विषयांच्या लोकसाहित्यातूनच आपण पुढे येत असतो, म्हणून लोकसाहित्याचे माणवी जीवनाची जडणघडण करण्यात अनन्यसाधारण महत्व आहे. यानंतर चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाचा समारोप प्राचार्य डॉ. बळीराम राख यांच्या भाषणाने झाला. चर्चासत्राचे बीजभाषण सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. लोकसाहित्याच्या अभ्यासाचा इतिहास स्पष्ट करताना ते म्हणाले की लोकसाहित्याच्या संकलनाचा १७ व्या शतकात युरोपमध्ये प्रारंभ झाला. इंग्राजांच्या सत्ताकालखंडात भारतीय लोकसाहित्याच्या अध्ययनाची सुरुवात झाली. वि. का. राजवाडे यांनी महाराष्टात लोक साहित्याच्या अभ्यास व संशोधनाची मुहूर्तमेढ रोवली. खरे तर कित्येक भटक्या जमाती व आदिम जातीच्या लोकसाहित्याचे संकलन व अध्ययन अजूनही झालेले नाही. त्याचे संकलन व संशोधन होणे गरजेचे आहे. लोकसाहित्याचा अभ्यास हा अशा जात-जमातींच्या विविध सण व उत्सवांमध्ये सहभागी होऊन प्रत्यक्ष व परिस्थितीजन्य पुरावे प्राप्त करून केला पाहिजे तेंव्हाच वास्तविक संशोधन साध्य होईल असे ते याप्रसंगी म्हणाले. लोकसंस्कृती अथवा आदिम संस्कृती व ग्रामीण संस्कृती यामध्ये बरेच साम्य असल्याचे दिसून येते. एका कोणत्या तरी मूळ संस्कृतीमधून त्या विकसित झाल्या असाव्यात असेही मत त्यांनी मांडले. औद्योगिकीकरण व जागतिकीकरणाच्या रेट्याने आपली ग्रामीण व लोकसंस्कृती उध्वस्त होते की काय अशी भीती निर्माण झाली आहे. लोकसाहित्य, लोकसंस्कृती लोप पावण्याआधी तिचे जतन केले जाणे गरजेचे आहे. पहिल्या सत्राचे आभारप्रदर्शन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रामनाथ वाढे यांनी केले.

निबंधसादरीकरणाच्या दुसऱ्या सत्रात प्रा. कुशाबा साळुंके, प्रा. डॉ. रेखा मुळे आदिंनी संशोधनपर लेखांचे सादरीकरण केले. सत्राचे अध्यक्षस्थान बामखेडे जि. नंदूरबार येथील कला महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. छबिलदास करंके यांनी भूषविले. चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. हमराज उईके यांनी केले. या आभारप्रदर्शन प्रा. डॉ. रामनाथ वाढे यांनी केले. या ई-चर्चासत्रात एकूण ८४ जणांनी सहभाग घेतला.

चंपावतीपत्र epaper.champavateepatra.in
वार-सोमवार दि.०१-०३-२०२१ २

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात 'लोकसाहित्याचे अंतरंग' विषयावर ई-चर्चासत्र संपन्न

पाटोदा । वार्ताहार

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २७ फेब्रुवारी रोजी 'लोकसाहित्याचे अंतरंग आणि त्याचे वैश्विक स्वरूप' या विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील त्रैभाषिक ई-चर्चासत्र उत्साहात संपन्न झाले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा मराठी विभाग आणि वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बळीराम राख होते. चर्चासत्राचे उद्घाटक विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख व मराठी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष डॉ. दासू वैद्य होते.

आपल्या उद्घाटनपर भाषणात डॉ. दासू वैद्य म्हणाले की लोककथांचा कोणी लेखक नसतो. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. लोककथा ह्या जीवनाचा एक भाग बनलेल्या असतात. लोकसाहित्याच्या आकलनाच्या नव्या दिशा धुंडाळतांना ते नवनवीन दृष्टिकोनातून अभ्यासून नवनवे अर्थ शोधून काढणे गरजेचे आहे. राजसत्ता व धर्मसत्ता यांच्या परिघाबाहेर राहणाऱ्या वर्गाकडून निर्माण होणारे साहित्य हे लोकसाहित्य असते या डॉ. नागनाथ कोतापल्ले यांच्या व्याख्येचा संदर्भ त्यांनी याप्रसंगी दिला. आपल्या बालपणापासूनच भोवतालच्या विविध विषयांच्या लोकसाहित्यातूनच आपण पुढे येत असतो, म्हणून लोकसाहित्याचे माणवी जीवनाची जडणघडण करण्यात अनन्यसाधारण महत्व आहे. यानंतर चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाचा समारोप प्राचार्य डॉ. बळीराम राख यांच्या भाषणाने झाला.

चर्चासत्राचे बीजभाषण सुंदराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. लोकसाहित्याच्या अभ्यासाचा इतिहास स्पष्ट करताना ते म्हणाले की लोकसाहित्याच्या संकलनाचा १७ व्या शतकात युरोपमध्ये प्रारंभ झाला. इंग्रजांच्या सत्ताकालखंडात भारतीय लोकसाहित्याच्या अध्ययनाची सुरुवात झाली. वि. का. राजवाडे यांनी महाराष्ट्रात लोकसाहित्याच्या अभ्यास व संशोधनाची मुहूर्तमेढ रोवली. खरे तर कित्येक भटक्या जमाती व आदिम जातीच्या लोकसाहित्याचे संकलन व अध्ययन अजूनही झालेले नाही. त्याचे संकलन व संशोधन होणे गरजेचे आहे. लोकसाहित्याचा अभ्यास हा अशा जात-जमातींच्या विविध सण व उत्सवांमध्ये सहभागी होऊन प्रत्यक्ष व परिस्थितीजन्य पुरावे प्राप्त करून केला पाहिजे तेंव्हाच वास्तविक संशोधन साध्य होईल असे ते याप्रसंगी म्हणाले. लोकसंस्कृती अथवा आदिम संस्कृती व ग्रामीण संस्कृती यामध्ये बरेच साम्य असल्याचे दिसून येते. एका कोणत्या तरी मूळ संस्कृतीमधून त्या विकसित झाल्या असाव्यात असेही मत त्यांनी मांडले. औद्योगिकीकरण व जागतिकीकरणाच्या रेट्याने आपली ग्रामीण व लोकसंस्कृती उध्वस्त होते की काय अशी भीती निर्माण झाली आहे. लोकसाहित्य, लोकसंस्कृती लोप पावण्याआधी तिचे जतन केले जाणे गरजेचे आहे. पहिल्या सत्राचे आभारप्रदर्शन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रामनाथ वाढे यांनी केले.

निबंधसादरीकरणाच्या दुसऱ्या सत्रात प्रा. कुशाबा साळुंके, प्रा. डॉ. रेखा मुळे आदिंनी संशोधनपर लेखांचे सादरीकरण केले. सत्राचे अध्यक्षस्थान बामखेडे जि. नंदूरबार येथील कला महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. छबिलदास करंके यांनी भूषविले. चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. हमराज उईके यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. डॉ. रामनाथ वाढे यांनी केले. या ई-चर्चासत्रात एकूण ८४ जणांनी सहभाग घेतला.